**MHKO100001502023**

# आदेश
## (निशाणी ५ वरील)

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ नुसार प्रतिवादी क्र. १ ते ७ यांचेविरुध्द तुर्तातुर्त ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**२.** मौजे करंबळी, तालुका गडहिंग्लज येथील जमीन गट नं. ३९९, ४०० व ४०२ या मिळकतींच्यामध्ये असलेली मोकळी जागा जी या दाव्यात व अर्जात चतुर्सिमेसह वर्णन केलेली मिळकत या अर्जाचा मुख्य वाद विषय आहे.

**३.** अर्ज वाचला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी कैफीयत दिली नाही. प्रतिवादी क्र. ७ हा दाव्यात हजर झाला नाही. पुर्नउल्लेख टाळण्याकरीता मुळ अर्जातील मजकुर विस्ताराणे घेतला नाही. वादीतर्फे विधीज्ञ श्रीमती टी. आर. कणसे यांचे युक्तीवाद ऐकला.

**४.** अर्जाच्या निर्गतीच्या दृष्टीने खालील वादप्रश्न माझ्या विचारार्थ उपस्थित झाले. त्याचे कारणासहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीला सकृतदर्शनी केस आहे काय ? | **होय** |
| 2 | न्यायाचा समतोल वादीचे बाजुने आहे काय ? | **होय** |
| 3 | मनाई नाकारल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल काय ? | **होय** |

| | | |
|---|---|---|
| ४. | काय आदेश ? | **अंतिम आदेशात नमूद केलेप्रमाणे.** |

## <u>का र ण मी मां सा</u>

**<u>वादप्रश्न क्रमांक १ ते ३ बाबत</u>** -

**५.** वरील तिन्ही वादप्रश्न एकमेकाशी संलग्न असल्याने व त्यांची वारंवार होणारी चर्चा टाळणेकरीता सर्व वादप्रश्न एकत्रीतपणे चर्चीले आहेत. दावा, अर्ज व प्रकरणातील कागदपत्रे पाहीली. या प्रकरणामध्ये वादी तसेच पक्षकार म्हणून सामील केलेले प्रतिवादी क्र. ८ ते १२ यांचे कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा होत असलेबाबत वादीचे कथन आहे. वादीने दावा मिळकतीची वस्तुस्थिती दाखविण्याकरीता निशाणी क्र. ७ वर फोटोग्राफस दाखल केलेले आहेत. त्यावरुन असे दिसते की, त्या ठिकाणी जेसीबीच्या सहाय्याने रस्ता करण्याचे काम सुरु आहे. दाव्यातील कथनावरुन असे दिसते वादी तसेच प्रतिवादी क्र. ८ ते १० हे जमीन गट नं. ३९९ चे मालक व कब्जेदार आहेत. सदर गटाच्या उत्तर बाजूला त्यांनी खुली जागा ठेवलेली आहे. त्या खुल्या जागेच्या उत्तर बाजूला गट नं. ४०० व ४०२ हे आहेत. वादीने दाव्यासोबत गटाचा नकाशा दाखल केलेला आहे. त्यामध्ये वादातीत रस्ता कोणत्या दिशेला होत आहे हे लाल रंगाने दर्शविलेले आहे. या प्रकरणात अंतरिम आदेश केल्यानंतर प्रतिवादींना नोटीसा काढून त्यांचे म्हणणे दाखल करण्यास संधी देण्यात आली होती. परंतु प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल केले नाही अथवा प्रस्तुत अर्जास विरोध केलेला नाही. प्रतिवादी क्र. १ ही ग्रामपंचायत आहे. वादीची ग्रामपंचायत करंबळी यांचे विरुध्द तक्रार आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. १ ग्रामपंचायत तसेच इतर प्रतिवादी यांनी सदर रस्ता करण्याकरीता जमीन संपादित झाली आहे किंवा काय याबाबतचे कायदेशिर कागदपत्र हजर करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी सदर गटातील जमीन

रस्त्याकरीता मंजूर झाल्याबाबतचे कोणतेही कागदपत्र हजर केलेले नाहीत. निशाणी क्र. ३ सोबत वादींनी गट नं. ३९९, ४०० व ४०२ चे ७/१२ उतारे सादर केलेले आहेत. वादीच्या कथनाप्रमाणे गट नं.३९९ मध्ये वादी व प्रतिवादी क्र. ८ ते १० यांचा हक्कसंबंध दिसत आहे. प्रतिवादींनी सदर मिळकतीमधून रस्ता करणेसाठी कोणते कारण घडले आहे याबाबत अभिलेखावर काहीही आणलेले नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी वादी व प्रतिवादी क्र. ८ ते १२ यांचे संमत्तीशिवाय दावा मिळकतीमधून रस्ता केलेस वादींच्या मिळकतींचे नुकसान होणार आहे. वादीनी सकृतदर्शनी केस दाखवून दिलेली आहे. प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी बेकायदेशिरपणे रस्ता केलेस व त्यावर खडी व डांबर टाकलेस वादीच्या मिळकतीचे अपरिमीत नुकसान होईल असे दिसते. न्यायाचा कल वादीच्या बाजुने असल्याचे कागदपत्रामधील नोंदीवरुन दिसते. परिणामतः सबब वादप्रश्न क्र. १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदविले व वादप्रश्न क्र. ४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१) अर्ज खर्चासह मंजुर करणेत येतो.

२) प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी स्वतः अगर इतरामार्फत गट नं. ३९९, ४०० व ४०२ या मिळकतीमधील दाव्यात नमुद मोकळया जागेत म्हणजेच दावा मिळकतीमध्ये या दाव्याचे अंतिम निर्णयापर्यंत रस्ता करु नये तसेच वादी व प्रतिवादी क्र. ८ ते १२ यांच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये अशी त्यांना तुर्तातुर्त ताकीद देण्यात येते.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

Digitally signed by Maheshkumar Tanajirao Kharade
Date: 2023.03.23 11:52:04 +0530

**ठिकाण – गडहिंग्लज** **(म. ता. खराडे)**
**दिनांक – २१-०३-२०२३.** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, गडहिंग्लज**